प्रेसनोट दि. १५/०१/२०१८

**अवैधरित्या विनापरवाना एक अग्निशस्त्र व पाच काडतुसे बाळगणा-या दोन गुन्हेगारांस गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडून शिताफिने अटक**

०००००००००००००००००००००००००००००

दरोडा प्रतिबंधक पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर चे पोलीस निरीक्षक, श्री. राजेंद्र कदम यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, खडक पोलास स्टेशन रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे विशाल शिवाजी खरात हा त्याचा साथीदार शतुल प्रभाकर नाडे याचेसह सिल्हवर रंगाच्या वॅगनार कार मधुन खराडी बायपास रोडवरील तुलसी व्हेज रेस्टॉरंट समोर आलेले असुन त्यांचेकडे गावठी पिस्टल आहे. आशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यानुसार पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम व त्यांचे अधिनस्त पोलीस कर्मचारी संजय दळवी, यशवंत आंब्रे, अजय थोरात, निलेश पाटील, महेश कदम, परवेज जमादार, प्रविन जाधव, विल्सन डिसोझा यानी सापळा रचुन खराडी बायपास रोडवरील तुलसी व्हेज रेस्टॉरंट पुणे येथे इसम नामे १) **विशाल शिवाजी खरात** वय २८ वर्षे, रा.जनता वसाहत, गल्ली नं. ३७ मध्यवर्ती मित्र मंडळ जवळ पर्वती पुणे. २) **शतुल प्रभाकर नाडे** वय २७ वर्षे रा. ५४ एचपी लोहीया नगर जय शिवाजी मित्र मंडळा जवळ गंज पेठ पुणे यास **दि.१३/०१/२०१८ रोजी १२/४० वा.** चे सुमारास अटक करुन त्याचे कब्जातून **एक गावठी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह** किंमत रु. ३५,०००/- व **०५ काडतुसे** कि.रु १०००/- चे तसेच **सिलव्हर रंगाची वॅगनार कार नं. MH-12/MF-3874** किंमत रु. ६,००,०००/-. ची असा **सर्व मिळून ६,३६,०००/- रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आलेला आहे**. नमुद इसमां विरुध्द पोलीस हवालदार अजय थोरात यांनी फिर्याद दिल्यांने चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे येथे भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस सह आयुक्त श्री रविंद्र कदम, मा.अपर पोलीस आयुक्त श्री प्रदिप देशपांडे, मा.पोलीस उप आयुक्त श्री.पंकज डहाणे, सपोआ गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे सूचनेप्रमाणे गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, पोलीस कर्मचारी संजय दळवी, यशवंत आंब्रे, अजय थोरात, निलेश पाटील, महेश कदम, परवेज जमादार, प्रविन जाधव, विल्सन डिसोझा यांनी सदरची कारवाई केलेली आहे.